# स.गा.म. कॉलेज, कराड येथे ‘आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र’ सुरू

सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत **आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा** उद्‌घाटन समारंभ ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचे शुभहस्ते व मंत्री मा. मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या उद्‌घाटन सोहळयासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, उपप्राचार्य प्रा.एस.ए.पाटील, समन्वयक डॉ. संदीप महामुनी, प्रबंधक डॉ. अरूणकुमार सकटे, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी महाविद्यालयात सुरू झालेल्या कौशल्य विकास केंद्राबाबत माहिती देत विद्यार्थ्यांना सध्याच्या काळात नियमित शिक्षणाबरोबरच कौशल्यांची कशी आवश्यकता आहे ही माहिती दिली. तसेच महाविद्यालयात सुरू होणाऱ्या कौशल्य अभ्यासक्रमांचा कराड परिसरातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा असे आवाहन केले. डॉ.संदीप महामुनी यांनी महाविद्यालय कौशल्य विकास केंद्राअंतर्गत सुरू केल्या जाणाऱ्या ‘ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर’ व ‘हेअर ड्रेसर अॅड स्टायलिस्ट’ या कौशल्य अभ्यासक्रमांची माहिती दिली.

कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री. चंद्रकांत दळवी, सचिव श्री. विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन अॅड. रवींद्र (भाऊ) पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी मोलाचे योगदान दिले.
















प्राचार्य

स. गा. म. कॉलेज, कराड